पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४२७ दिनांक - १०/०६/२०२३**

## युनिट- ०१,गुन्हे शाखा,पुणे शहर

## बाहेर गावांकडुन येणारे प्रवाश्यांना मारहाण करुन लुटणारे जेरबंद

दिनांक १३/०४/२०२३ रोजी फिर्यादी रा.सिंहगड रोड पुणे हे संभाजीनगर येथुन सकाळी ०५/३० वा सुमारास शिवाजी पुतळा चौकात शिवाजीनगर पुणे येथे बस मधुन उतरुन राहते घरी जात असताना त्यास अज्ञात चार जणांनी मारहाण करुन त्यांचेकडील बॅग व मोबाईल जबरीने चोरुन घेवुन गेले बाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे गुरनं ९०/२०२३ भादंवि कलम ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

युनिट-१ चे अधिकारी व अंमलदार सदर गुन्हयाच्या समांतर तपास करीत असताना **पोलीस अंमलदार,दत्ता सोनावणे** यांना त्यांच्या बातमीदाराकडून बातमी मिळाली की,शिवाजी मार्केट,चिकन मार्केट समोर लष्कर कॅम्प पुणे येथे दोन इसम मोबाईल विक्री करिता येणार असुन त्यांचेकडे चोरीचा मोबाईल आहेत.अशी बातमी प्राप्त झाल्याने लागलीच युनिट-१ चे प्रभारी अधिकारी मा.पोनि श्री.शब्बीर सय्यद युनिट -१ गुन्हे शाखा पुणे यांनी टिम तयार करुन शिवाजी मार्केट येथे चिकन सेंटरच्या समोर पुणे येथे मिळालेल्या बातमी प्रमाणे दोन इसम आल्यानंतर खात्री झाल्यानंतर त्यांना सदर ठिकाणी सापळा लावुन सायं १८/४० वा छापा टाकून सदर इसमास आहे त्या स्थितीत ताब्यात घेवून त्याचे नावे पत्ते विचारता त्यांनी आपले नावे पत्ते **१)संदीप सुनिल ठाकुर,वय २१ वर्षे,रा.वाल्मीकीनगर,रामटेकडी हडपसर,पुणे २)हुसेन बाबमिया शेख,वय २० वर्ष,रा.विडीओ सेंटर गल्ली,बाबाजान चौक,लष्कर,पुणे** असे सांगितले. त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या मोबाईलचे वर्णन १) १०,०००/-रु. किंमतीचा एक विवो कंपनीचा वी २० प्रो विवो २०१८ चा मोबाईल ताब्यात घेवुन जप्त केला आहे. सदर इसमांना पुढील कारवाई कामी शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर श्री.सुनिल पवार,यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद युनिट ०१, पोलीस उप निरीक्षक सुनिल कुलकर्णी, पोउनि रमेश तापकिर,पो.अंमलदार.दत्ता सोनावणे,राहुल मखरे,इम्रान शेख,अभिनव लडकत,आय्याज दड्डीकर,निलेश साबळे, शुभम देसाई,अनिकेत बाबर,शशिकांत दरेकर,रुक्साना नदाफ,तुषार माळवदकर व महेश बामगुडे यांनी केली आहे.